महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
ता. राहुरी, जि. अहमदनगर, पिन-४१३७२२

दुरध्वनी क्रमांक(०२४२६)२४३३७४ फॅक्स क्र. (०२४२६)२४३३७४/२४३२३८
e-mail: ac2mpkv@gmal.com.

जा.क्र. मफुकृवि/लेखा शाखा-२/ ८६४ /२०१७ दिनांक :१५/१२/२०१७

# परिपत्रक

विषय- मुकबधीर तसेच श्रवण शक्तीतील दोष असलेल्या राज्य शासकीय कर्मचा-यांना वाहतूक भत्ता मंजूर करणेबाबत.:

संदर्भ- १. शासन निर्णय,वित्त विभाग क्रमांक वाहभ-२०१४/प्र.क्र.१६/सेवा-५, दिनांक १० ऑगस्ट, २०१५.
२. शासन पूरकपत्र क्रमांक: वाहभ-२०१४/प्र.क्र./१६/सेवा-५,दिनांक १८ एप्रिल २०१७.

(अ) महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी अंतर्गत सर्व आहारण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ नुसार राज्य शासकीय कर्मचा-यांना सर्वोच्च न्यायालयाने दि.१२.१२.२०१३ रोजी writ Petition (civil) No.१०७/२०११ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या अर्थ मंत्रालयाने दि.१९.०२.२०१४ रोजी निर्गमित केलेल्या ज्ञापनाअन्वये, केंद्र शासकीय मुकबधीर (Deaf and dumb employees) कर्मचा-यांना अंध व अस्थिव्यंगाने अधू कर्मचा-यांना (Blind and Orthopedically handicapped employees) अनुज्ञेय असलेल्या दराने, वाहतूक भत्ता मंजूर केला आहे. तसेच केंद्र शासनाने त्यांच्या दि.१७.०१.२०१७ च्या ज्ञापनाअन्वये केंद्र शासनातील श्रवणशक्तीतील दोष असणा-या कर्णबधीर कर्मचा-यांकडून केंद्र शासनाच्या अपंग व्यक्तीसाठीच्या (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम २(एल) मध्ये विहीत केलेल्या कर्णबधीर कर्मचा-यांबाबत केलेल्या व्याख्येनुसार पूर्तता होत असल्यास त्यांना दुप्पट दराने वाहतूक भत्ता अनुज्ञेय केला आहे

(ब) त्यान्वये महाराष्ट्र राज्य शासनाने देखील हा विशेष वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्याबाबतचा शासन निर्णय दि.१०.०८.२०१५ रोजी निर्गमित केला आहे. आता, अपंग व्यक्तीसाठीच्या (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील कलम २(एल) मध्ये केलेल्या श्रवण शक्तीतील दोष (Hearing Impairment) च्या व्याख्येनुसार Hearing impairment means loss of sixty decibels or more in the in the better ear in the conversational range of frequencies असा श्रवणदोष असणा-या कर्मचा-यांना अंध, अस्थिव्यंगाने अधू व कण्याच्या विकाराने पिडीत असणा-या राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचा-यांना अनुज्ञेय केलेल्या दराने, वाहतूक भत्ता अनुज्ञेय करण्यात येत आहे. (Transport Allowance is made admissible to the Hearing impaired employees, having loss of ६० decibels or more in the better ear in the conversational range of frequencies, as provided in persons with disabilities (Equal Opportunities, Protection of Rights and Full Participation) Act,१९९५), as admissible at the rate equal to blinds, orthopaedically handicapped and Hunchback disability state Government employees.

(क)या पूरकपत्राचा लाभ घेवू इच्छिणा-या कर्णबधीर शासकीय कर्मचा-यांना (Hearing impaired Government employees) उपरोक्त परिच्छेदातील सन १९९५ च्या अधिनियमातील कलम २(एल) मध्ये केलेल्या व्याख्येनुसार शासकीय रुग्णालयाच्या नाक कान घसा विभाग प्रमुखाचे अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच मुकबधीर /श्रवण शक्तीतील दोष असणा-या कर्मचा-यांना शासन परिपत्रक वित्त विभाग ०४.०६.२००१ मधील अटी व शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १०.०८.२०१५ मधील अट क्रमांक २ लागू राहील.

(ड) वरील शासन पूरकपत्रानुसार विद्यापीठातील कर्णबधीर कर्मचा-यांना वाहतूक भत्ता मंजूर करणेबाबत आहरण व संवितरण अधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

नियंत्रक
म.फु.कृ.वि., राहुरी

प्रत- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित..
१. संचालक, कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण, मफुकृवि, राहुरी
२. सहयोगी अधिष्ठाता शिक्षण व संशोधन (सर्व), विभाग प्रमुख (सर्व)
३. उप-कुलसचिव (प्रशासन/विद्या), सहा.नियंत्रक/सहा. कुलसचिव (सर्व)
४. अधिदान व लेखा अधिकारी, पुणे/धुळे/कोल्हापुर/राहुरी/ अति. अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी
५. मा. कुलगुरु,कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक मफुकृवि, राहुरी